सामुहिक उद्योजकता

लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा मार्ग

H. R. Mallesh and T. Parthasarathy

मका हे कर्नाटकमधील, विशेषत: लहान शेतकऱ्यांचे प्रमुख पिक होय. चीक्कायेम्मिगनुरू गावातील मका पिकवणारे शेतकरी एकत्र येऊन त्यांनी एक सामुहिक उपक्रम सुरु केला आणि त्याद्वारे आपल्या उत्पादनाच्या किमती आपल्या हातात घेतल्या. कणसाचे रिकामे घुटे इंधन म्हणून वापरून या गटाने एका बाजूला पर्यावरणाच्या प्रती संवेदनशीलता दाखवली व दुसरीकडे त्यातून कमाई पण वाढवली.

कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यातील होलाल्केरे तालुक्यातील चीक्कायेम्मिगनुरू गाव. ८४० कुटुंबाच्या या गावात सुमारे ८० टक्के शेतकरी पावसाच्या पाण्यावर मक्याचे उत्पादन करतात. इत्तर कोणत्या पिकापेक्षा हे शेतकरी मक्याचे पिक पसंत करतात कारण पावसाच्या पाण्यावर फार कष्ट न करता पिकवता येते. तुलनेने या पिकावर कमी रोग पडतात. आणि परिणामी पिकावरील उत्पादन खर्च कमी लागतो. साधारणत: एक हेक्टर मध्ये ६० ते ७५ क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. म्हणजे प्रती हेक्टर रु. १५००० चे उत्पन्न मिळते व इत्तर पिकांच्या मानाने या पिकाला फार जोखीम नसते. मक्यापासून उपमा, डोसा, रोटी ई. खाद्य पदार्थ बनवता येतात. यापासून पशुखाद्य देखील बनविले जाते. पिकाव्यातिरिक्त मक्याचे इत्तर अवशेष मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा उपयोग खत बनविण्यासाठी होतो. त्याचा कडबा गुरांसाठी चारा म्हणून वापरला जातो. मक्याचे दाणे काढल्यानंतर शिल्लक राहणारे घुटे इंधन म्हणून वापरता येते. पण हे शेतकरी हे घुटे फेकून देत होते.

२०१७ च्या मे महिन्यात मायराडा ग्रीन कॉलेजने मक्याचे उत्तम पिक कसे घ्यावे या बद्दल ३० शेतकऱ्यांचे प्रशिक्षण घेतले. मायराडा ग्रीन कॉलेज म्हणजे कृषि आधारित मिळकत वाढीचे विविध उपक्रम कसे करायचे या बाबत कौशल्य प्रशिक्षण देणारी संस्था आहे. ह्या संस्थेची निर्मिती २०१६ मध्ये मायराडा व वेल्थून्गरहिल्फे यांनी मिळून स्थापन केली. यामध्ये त्यांना GLZ German Federal Ministry of Economic Cooperation and Development (BMZ) यांच्या Green Innovation Center अंतर्गत आर्थिक सहयोग



जीवाष्म इंधनाला पर्याय म्हणून कृषि अवशेषापासून इंधन बनवले जाते.

मिळाला. मायराडा ग्रीन कॉलेज अंतर्गत Agri-business Promotion center (ABPC) आहे. मायराडा ग्रीन कॉलेज ने उभारलेल्या अशा सर्व उपक्रमांना ABPC मदत करीत असते.

प्रशिक्षित शेतकऱ्यांना एकत्र करून मका पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा 'समृद्धी मेके जोला बेगारारा संघ' या नावाने एक गट बनविला. हा गट दर महिन्याच्या ५ तारखेला एकत्र येऊन एकंदर अनुभव, प्रशिक्षणातून शिकलेले प्रत्यक्षात आणताना येणारे प्रत्यक्ष अनुभव कथन तसेच शेती संदर्भातील इत्तर काही विषय यावर चर्चा करतात. सर्व सदस्य ५० ते १०० रुपये दर सभेच्या वेळी जमा करतात. आत्तापर्यंत त्यांचे रु. १९५२० बँक मध्ये जमा आहेत.



गटातील शेतकरी मका हर्वेस्टर मशीन चा वापर व व्यवस्थापन करताना

उद्योजकता

शेतकऱ्यांसोबतच्या चर्चे मध्ये मक्याचे दाणे काढणी बद्दलचा प्रश्न समोर आला. सामान्यत: मक्याचे पिक काढून शेतातच सुकवले जाते व बाजारात योग्य भाव येईपर्यंत वाट पाहिली जाते. विक्रीपूर्वी कणसातून दाणे काढून घ्यावे लागतात. हे दाणे काढण्याचे काम वेळखऊपणाचे तर आहेच शिवाय त्यासाठी मजूर मिळणे सुद्धा कठीण असल्याचे शेतकऱ्यांना जाणवले. मशीनने दाणे काढणे हा एक पर्याय आहे व त्याने काम सोपे व लवकर पण होते, हे शेतकऱ्यांना समजत होते. पण त्यासाठी या लहान शेतकऱ्यांना ज्यांच्याकडे अशी मशीन आहेत अशा मोठ्या शेतकऱ्यांच्यावर किंवा व्यापाऱ्यावर अवलंबून राहावे लागत. ते देखील जेव्हा हवे तेव्हा ते मशीन मिळत नव्हते. त्यामुळे लहान शेतकऱ्यांचे नुकसान होत होते.

वेळेवर व बाजारात चांगला भाव मिळतो त्यावेळी मक्याचे दाणे काढायला न मिळणे म्हणजे शेतकऱ्यांचे नुकसान कसे होते ते एका सिझन मध्ये वर खाली होणारे मक्याचे बाजार भाव पाहिल्यानंतर लक्षात येते. गेल्या सिझन मध्ये (नोव्हेबर २०१७ ते एप्रिल २०१८) मक्याचे भाव १०६० ते १२८० प्रती क्विंटल असे राहिले होते. अर्थात मक्याचे भाव बाहेरील आवक (बिहार) तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील उलाढाल यावर अवलंबून असतात आणि शेतकरी यावर डोळा ठेवून असतात. पण नेमके बाजारभाव वाढायच्या वेळी दाणे काढणाऱ्या थ्रेशर मशीनची मागणी वाढते आणि अनेक शेतकऱ्याचे दाणे काढून होत नाहीत कारण त्यांना थ्रेशर मशीन मिळत नाही. शेवटी चांगला भाव असून सुद्धा त्यांना आपला मका बाजारात आणता येत नाही. एका बैठकीत कारीबासाप्पा शेतकरी विषण्ण मनानी बोलला "माझे स्वताचे थ्रेशर मशीन असते तर मी १२०० रुपये क्विंटल दराने माझा मका विकला असता आणि माझ्या ९६ क्विंटल चे मला जवळ जवळ १०,००० रुपये जास्त मिळाले असते" गटातील शेतकऱ्यांनी मायराडा ग्रीन कॉलेज सोबत चर्चा केली आणि अशा लहान शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल यावर सामुहिक विचार केला.

Agri Business Promotion Center (ए.बी.पी.सी.) ने मशीन संदर्भात सर्व माहिती मिळवून गटातील शेतकऱ्यांना सांगितली. लगेच सर्व शेतकरी आपले स्वत:चे मशीन घेण्यास तयार झाले. स्वता वापरून त्याचे व्यवस्थापन करण्याची तयारी दाखवली. मशीनची किंमत व खरेदी बाबत चर्चा झाली. मशीनची किमत १,८८,००० रुपये होती. शेतकऱ्यांची एवढी कुवत नव्हती. कृषि विभागाकडे त्यावेळी थ्रेशर मशीनला सबसिडी होती. तीच मशीन ८८००० रुपये ला मिळत होती. पण तेवढी रकम सुधा जमा करणे या गटाला अवघड होते.

म्हणून ए.बी.पी.सी. ने मग ८८,०००/- रुपयांची मदत केली. सबसिडी मिळण्यास पात्र असलेल्या शेतकऱ्याची (नागप्पा) निवड केली. त्यानुसार नागप्पा, शेतकरी गट व एबिपिसी या तिघांमध्ये तसा करार झाला. अशा रीतीने थ्रेशर मशीन डिसेंबर २०१७ मध्ये खरेदी केले गेले व २ जानेवारी पासून ते समृद्धी शेतकरी गटाला चालवण्यास दिले.

थ्रेशर ची मूळ किम्मत रु. १,८८,००० एवढी आहे पण सबसिडी नंतर त्यांना तो रु. ८८,००० ला मिळाला

खर्च				जमा / मिळकत			
क्र	बाब	युनिट	दर	एकूण रक्कम	बाब	युनिट	दर	एकूण रक्कम
१	डीजेल (ली.)	१५०	६६.००	९९००	मक्याचे दाने			
					काढणी भाडे	२८८१	५०	१४४०५०
२	तेल (ली.)	१५	११०	१६५०				
३	सेवा	२	१३००	२६००				
४	मजूर	मिळकतीच्या	४५%	५७०००				
५	गटाला	दिलेली	रकम	३६०००				
		एकूण		१०७७७०		एकूण		१४४०५०
			व्यवस्थापकाचा फायदा					३६२८०

ए. बी. पि. सी ने या गटाला थ्रेशर मशीनच्या तांत्रिक बाबीपासून ते व्यवस्थापन बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. थ्रेशर मधून,मक्याचे दाणे काढण्याचा दर गटाच्या बाहेरील शेतकऱ्यासाठी ५० रुपये प्रती क्विंटल तर गट सदस्यांसाठी ४५ रुपये असा ठरला. काल्लेशाप्पा नावाच्या शेतकऱ्याची नेमणूक ऑपरेटर म्हणून केली. मशीन चालवण्यासाठी येणारा खर्च, देखभाल खर्च आणि विमा ई. खर्च होणाऱ्या मिळकतीतून काढला जाईल असे ठरले. राहिलेल्या पैशातून गटासाठी ३६००० रुपये ठेवले जातील व उरलेले काल्लेशाप्पाला दिले जातील असे ठरले.

मका पणन

एकूण ५१ दिवस थ्रेशर एका सिझनमध्ये चालले व सुमारे ७८ शेतकऱ्याचा मका काढून दिला गेला. मे महिन्यात ऑपरेटर ने

ठरल्यानुसार मशीन एबिपिसीला परत केले. गटाला ३६,००० रुपये दिले आणि उद्योजकाला ३६,२८० शिल्लक राहिले.

कोडागावालीहत्ती या गावचा शेतकरी राजकुमार म्हणतो ''काल्लेशाप्पा ने थ्रेशरची खूप चांगली सेवा पुरवली. बाजारात चांगला भाव होता तेव्हा मी १२० क्विंटल मका काढून घेतला व त्यासाठी व्यापाऱ्याकडुन पैसे आल्या आल्या ६००० रुपये काल्लेशाप्पाला दिले. पूर्वी जेव्हा भाव चांगला असेल तेव्हा माझ्या गावातील थ्रेशर साठी मी खूप प्रयत्न करायचे, पण थ्रेशर मिळत नव्हता. या गटाचा शेतकरी अशोक याने मला त्यांच्या गटाच्या थ्रेशर बद्दल सांगितले. दर सुद्धा कमी असल्याचे कळले. मग मी व आणखी शेतकऱ्यांनी मिळून काल्लेशाप्पा यांना फोन केला. लगेच दुसऱ्या दिवसापासून त्याने आमच्या गावात थ्रेशर सुरु केला. आमच्या गावातील ज्या शेतकऱ्यांनी या थ्रेशरनी मका काढून घेतला ते सर्व खुश आहेत कारण त्यांना वेळेत दाणे काढून मिळाले व बाजार भाव चांगला मिळाला''.थ्रेशर ऑपरेटर काल्लेशाप्पा ला देखील एकाच सिझनमध्ये बऱ्यापैकी पैसा मिळाला. गरजेनुसार एकूण मिळकतीच्या ४५% चार ते सहा कामगारांना त्यांची मजुरी म्हणून देण्यात आली.

जास्तीचे फायदे

या शिवाय एबीपिसीने भूरकुंडे विकण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली. कणसातून दाणे काढल्यानंतर भूरकुडांचा ढीग लावून ठेवला जायचा व मग जाळून टाकला जायचा कधी कधी व्यापारी अगदी मातीमोल भावाने खरेदी करायचे.

भूरकुंडला चांगला भाव यावा म्हणून सर्व शेतकऱ्यांकडून भूरकुंडे एकत्र करणे व गायत्री अग्रो फुएल पर्यंत वाहतूक करून चढ्या दराने त्यांना विकण्याचे सुरु केले. गायत्री अग्रो फुएल साधारणत: ८० ते ९० कि.मी. अंतरावर आहे. मक्याचे भूरकुंड, भुईमुगाच्या शेंगाचे टरफले, कॉफी चे टरफले ई. शेतीतील टाकाऊ वस्तुंपासून उपयुक्त वस्तू बनवण्याचे काम गायत्री अग्रो फुएल उत्तम करीत आहे. असे टाकाऊ पदार्थ मिक्सर मध्ये टाकून त्याची पावडर बनवली जाते व नंतर बॉयलर मध्ये टाकण्यासाठी त्याचे ठोकळे बनवले जातात. अशा ठोकळ्याना चांगली मागणी आहे. गायत्री कंपनीला तर असा माल कमी पडत आहे. तेल किवा कोळसा या सारखे पदार्थ उर्जा निर्माण करण्यासाठी वापरण्याच्या ऐवजी या ठोकळ्यांचा उपयोग पर्यावरणाच्या दृष्टीने देखील उपयुक्त आहे. एबीपिसी च्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या या उपक्रमामुळे एरव्ही शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमतीपेक्षा दुप्पट, तिप्पट भाव मिळत आहे. हे तसे दिसायला सोपे वाटत असले तरी त्यामधला बारकावा शिकण्यासारखा आहे. उदा. जास्तीत जास्त माल ट्रक मध्ये राहील या बाबतीत कौशल्य. सुरुवातीला ५.५ ते ६.५. टन माल चढवला जात होता पण अनुभवाच्या आधारे आता ९ ते १० टन माल भरला जात आहे.

उपक्रमाचे सर्व तपशील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे

क्र.	मक्याची भुर्कुडे	किंमत रु./ टन	एकूण रक्कम रु.	शेरा
१.	५.५. टन	२४००	१३२००.००	१ ट्रक
२.	६.२ टन	२४००	१४८८०.००	१ ट्रक
३.	६.५ टन	२५००	१६२५०.००	१ ट्रक
४.	६.०० टन	२५००	१५०००.००	१ ट्रक
	एकूण		**५९३३०.००**	

खर्चाचा तपशील

क्र.	तपशील	संख्या	खर्चाचा तपशील (रु.)	शेरा
१	भूराकुंडाची किमत	२४.२ टन	१७४५०.००	शेतकर्याकडून एकूण किमतीत खरेदी
२.	वाहतूक खर्च	४ ट्रीप	२६०००.००	
३.	मजूर खर्च	१९	११५००.००	
	एकूण खर्च –		**५४९५०.००**	
	विक्रीची किंमत –		५९३३०.००	
	खर्चाचा तपशील–		५४९५०.००	
	एकूण नफा –		**४३८०.०० फक्त २४.२ टनासाठी**	

शेतकरी जेव्हा दलालाला माल विकत होते तेव्हा त्यांना २५० ते ३०० रुपये प्रती टन मिळत होते पण आता तोच माल थेट गायत्री कंपनीला विकत असल्यामुळे त्यांना ६५० ते ७५० रुपये टणाचा भाव मिळत आहे. होलाल्केरे गावचा हलम्मा शेतकरी म्हणतो ''मी माझ्या तीन एकरात मका पिकवतो. मी थ्रेशर वापरला व १२५० रुपये क्विंटल दराने मका विकला. सुमारे ०.६ टण भूरकुंडे विकून मला जास्तीचे ५५० रुपये मला मिळाले.'' हा फायदा अगदी उघड दिसत असताना देखील शेतकऱ्यांना या प्रक्रियेत येण्यासाठी उद्युक्त करणे कठीण जाते, कारण भूरकुंडे खूपच स्वस्त माल असतो. म्हणून मग त्यांच्यातलेच काही उद्योजक नेमले आहेत. सीनाप्पा हा त्यांच्यापैकी एक. गायत्री कंपनी व शेतकरी यांच्यामधला तो दुवा म्हणून काम करतो. तो म्हणतो ''शेतकऱ्यांकडून भूरकुंडे विकत घेणे व ट्रकमध्ये चढवणे मी शिकलो. मी साधारणता प्रती ट्रक प्रति दिवस ७०० रुपये कमावतो. शेतकऱ्यांना त्यांच्या गटाद्वारे थेट गायत्री कंपनीला भूरकुंडे विकण्यासाठी तयार करावे लागते.''

शेतीतील टाकाऊ वस्तूंचे रुपांतर ब्रिकेटस मध्ये केले जाते. याला मागणी खूप आहे. शिवाय जीवाष्म इंधनाला हा एक उत्तम पर्याय आहे.



शेतकऱ्यांनी मक्याची भूरकुंडे गायत्री कंपनीकडे पाठवली.

आव्हाने व पुढील दिशा

शेतकरी गटाला हे समजले कि थ्रेशींग मशीन फायद्याचे आहे. त्यामुळे अजून एक थ्रेशर नवीन घेण्याच्या विचारात हा गट आहे. परंतु त्याच्या अगोदर या उपक्रमामध्ये बरीच आव्हाने व शिकवण आहे, ज्याच्यावर काम करावे लागेल. काही दाणे भूराकुंडला राहून जातात ते कसे थांबवता येईल? मक्याचे पिक झाल्यानंतर थ्रेशर तसाच पडून असतो. नाचणी, ज्वारी अशा पिकांचे दाणे काढण्यासाठी या मशीन मध्ये थोडाफार बदल करून वापर करता येईल का? सध्या एबीपिसी मशीन ची देखभाल व व्यवस्थापन करीत आहे. ही पूर्ण जबाबदारी गट घेऊ शकेल का? थ्रेशर एका जागेवरून दुसऱ्या जागी नेत असताना जर काही झाले तर त्यासाठी विमा लागू होत नाही. अशा अनेक बाबी आहेत कि ज्यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. धंद्यातले हे बारकावे असतात व त्यांना दुर्लक्षित करून चालत नाही.

मक्याचे दाणे काढण्यासाठी थ्रेशर वापरणे व भूरकुंडे एकत्रित विकून जास्त पैसा मिळवणे या यशस्वी अनुभवाच्या आधारे शेतकऱ्यांनी येत्या हंगामामध्ये लागतीसाठी लागणारे साहित्य एकत्रितपणे खरेदी केले. त्यामुळे त्यांना सर्व साहित्य वेळेवर व कमी किमतीत मिळाले, शिवाय सावकाराकडून पैसे उधार घेण्याची गरज पडली नाही.

अजून एक असाच उपक्रम शेतकऱ्यांनी सुरु केला आणि तो म्हणजे मक्याचा कडबा कटर नी बारीक करून जनावरांना घालणे. यामुळे संपूर्ण कडबा गुरांच्या खाण्यात येतो व कचरा अगदी नगण्य राहतो. शेतकरी आपला मका एकत्रितपणे पशु खाद्य बनवणाऱ्या कंपनीला थेट विकू लागले. मक्यावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक बी. एम. वैद्य म्हणतात "प्रशिक्षणात शेतकरी फक्त शेतीमध्ये मशागत कशी करायची एवढेच शिकले नाहीत तर शेती एक उद्योग म्हणून कसा करायचा हे शिकले. चर्चेदरम्यान त्यांच्या हे लक्षात आले कि त्यांनी एकत्रित किवा सामुहिक रित्या काम करण्यात त्यांचा फायदा आहे. याच्यामुळे त्यांचे बरेच प्रश्न सुटले व त्यातून नवीन उद्योग करता आले. 'हजारो मैलाचा प्रवास एक पाऊल टाकून सुरु होतो. या शेतकऱ्यांनी सुरुवात तर चांगली केली आहे. त्याचे व एकंदर शेतकरी समूहाचे भविष्य त्यांच्या खांद्यावर आहे.

आभार

अनेक सहकाऱ्यानी मदत केल्यामुळे हा लेख लिहिता आला म्हणून लेखक त्या सर्वांचे आभार मानतात

T Parthasarathy
Project Coordinator,
(Green Colleges - Karnataka and Mahashtra)
Welthungerhife, Project Office, Myrada
2, Service Road, Domlur,
Bengaluru, Karnataka 560071

मराठी अनुवाद - श्री. दत्ता पाटील, युवा रुरल असोसिएशन, नागपूर

Source : *Group Enterprises- A way to enhance small farmer livelihoods, LEISA India, September 2018*